<u>प्रेस नोट ता. २९/०४/२०२३</u>    <u>पोलीस स्टेशन - वाकड</u>

# रिक्षा चोरी करणा-या सराईत गुन्हेगारास अटक, आरोपीकडुन ०३ गुन्हे उघड करत किं.रु.६,००,०००/- चा मुद्देमाल जप्त

## वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

--- ०० ---

पिंपरी चिंचवड परीसरात होणा-या वाहन चो-यां मध्ये मोठया प्रमाणावर वाढ झालेने **मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड,** यांनी सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना वाहन चो-या उघड करणेबाबत आदेश दिले आहेत.

त्या अनुषंगाने मा.श्री.सत्यवान माने,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकाकील सपोनि संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण व तपास पथक अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करून आरोपीना अटक करून गुन्हा उघड करणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी विश्वासु बातमीदारामार्फत बातमी काढणेचे काम सुरु केले. दरम्यान **सहा.पोलीस फौजदार बिभीषण कन्हेरकर** यांना विश्वासु बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, वाहन चो-या करणारा सराईत गुन्हेगार दिलीपकुमार विश्वकर्मा हा काळेवाडी परीसरात येणार आहे अशी बातमी मिळालेने. सपोफौ.कन्हेरकर यांनी सदरची बातमी सपोनि.संतोष पाटील यांना सांगीतली.

सपोनि.संतोष पाटील यांनी लागलीच स्वतः तसेच पोउपनि.सचिन चव्हाण तसेच तपास पथकातील पोलीस अंमलदार यांना घेवुन काळेवाडी येथील लकी बेकरी चौकात तेथे सापळा लावुन थांबले असता. बातमी प्रमाणे दिलीपकुमार विश्वकर्मा तेथे आला त्यास लागलीच सोबतचे स्टाफचे मदतीने ताब्यात घेतले.

दिलीपकुमार विश्वकर्मा यास पोलीस स्टेशन येथे आणुन त्यास विश्वासात घेवुन नाव पत्ता विचारला असता त्याने आपले नाव :- **दिलीपकुमार शालीग्राम विश्वकर्मा वय २४ वर्षे रा.ठोंबरे चाळ, पॅरीस कॉलनी, नं.१, तापकीर नगर काळेवाडी पुणे** असे सांगीतले.

त्याचेकडे कौशल्यपुर्वक तपास केला असता त्यांनी पिंपरी चिंचवड परीसरातील रिक्षा चोरीचे ०३ गुन्हयांची कबुली दिली त्याचेकडुन एकुण **६,००,०००/- रुपये किंमतीच्या ०३ रिक्षा** असा मुददेमाल हस्तगत करण्यात आला असुन तपास चालु आहे.

**आरोपीकडुन खालील गुन्हे उघड करणेत आले आहेत.**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | वाकड | ३३९/२०२३ | भादविक ३७९ |
| २ | वाकड | २६७/२३ | भादविक ३७९ |
| ३ | चतु:श्रींगी | २१२/२३ | भादविक ३७९ |

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.डॉ.संजय शिंदे सो, सह.पोलीस आयुक्त, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि-२, पिंपरी चिंचवड, मा. श्री. श्रीकांत डिसले, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.सत्यवान माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री. संतोष पाटील पोलीस निरीक्षक गुन्हे-१, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक गुन्हे-२, सपोनि. संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण, सपोफौ.बिभीषण कन्हेरकर, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे, पोहवा.वंदु गिरे, पोहवा संतोष बर्गे, पोहवा.संदीप गवारी, पोहवा.दिपक साबळे, पोहवा.स्वप्निल खेतले, पोहवा.अतिश जाधव, पोहवा.प्रमोद कदम, पोना.अतिक शेख, पोना.विक्रांत चव्हाण, पोना.राम तळपे, पोना.प्रशांत गिलबीले, पोशि.अजय फल्ले, पोशि.तात्या शिंदे, पोशि.कौतेंय खराडे, पोशि.भास्कर भारती, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि. सौदागर लामतुरे, पोशि.विनायक घारगे, पोशि रमेश खेडकर, यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड